**विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), कोल्हापूर यांचे कार्यालय**
सिमंतीनी अपार्टमेंट, सि.स.नं. १, ई वार्ड, रमणमळा, कोल्हापूर ४१६००३
**फोन क्र. ०२३१-२६६९७३० Email- dfowlkop@gmail.com**

जा. क्र. ब/कक्ष-योजना/कंत्राटी नियुक्ती/ ९८ /2021-22 दिनांक २८ / 04 /2021

विषय :- कंत्राटी तत्वावर पदे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करणेबाबत..

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राधानगरी व सागरेश्वर अभयारण्यातील विविध विकास कामांचे संनियंत्रण व अंमलबजावणी करणेकामी कोल्हापूर वन्यजीव विभागाकरीता सोबत जोडलेल्या जाहिरातीनूसार विविध कंत्राटी तत्वावरील पदांवर तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्यात येणार आहे. तरी सदर जाहिरातीस प्रसिध्दी मिळावी याकामी सदरची जाहिरात आपले कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावावी ही विनंती.

सोबत: जाहिरात

[वि. ह. माळी]
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर

प्रति,

वनक्षेत्रपाल (वन्यजीव) राधानगरी, दाजीपूर व सागरेश्वर.

प्रतिलिपी: सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव) राधानगरी यांना प्रसिध्दीकरीता रवाना.

प्रतिलिपी: मा. वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांना प्रसिध्दीकरीता सविनय सादर.

प्रतिलिपी: मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर यांना कोल्हापूर वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर मुखपृष्ठावर प्रसिध्दी करणेकामी सविनय सादर.

Scanned with CamScanner

विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), कोल्हापूर यांचे कार्यालय
सिमंतीनी अपार्टमेंट, सि.स.नं. १, ई वार्ड, रमणमळा, कोल्हापूर ४१६००३
फोन क्र. ०२३१-२६६९७३० Email- dfowlkop@gmail.com


दिनांक २६.०४.२०२१

## कंत्राटी तत्वावर पदे भरण्याकरीता जाहिरात

विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर यांचे अधिनस्त खालील पदे कंत्राटी पध्दतीने निवड करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | संख्या | कालावधी | मानधल (प्रति महा) अंदाजे |
|---|---|---|---|---|
| १ | निसर्ग तज्ञ | ०१ | ६ महिने | १५००० ते २०००० |
| २ | उपजिविका तज्ञ / सामाजिक तज्ञ | ०१ | ६ महिने | १५००० ते २०००० |
| ३ | कार्यालयीन व्यवस्थापक | ०१ | ११ महिने | १०००० |
| ४ | स्थापत्य अभियंता | ०१ | ११ महिने | १०००० ते १५००० |

सदर पदासाठी दिनांक २७ एप्रिल २०२१ ते ०३ मे २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) खालील पत्त्यावर लिखीत स्वरूपात अर्ज सादर करणेचे आहेत. सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्ला जाईल. आपले अर्ज dfowlkop@gmail.com या ई-मेलवर पाठविण्यात यावेत. मुलाखतीचा दिनांक व ठिकाण पात्र अर्जदारांना ई-मेल अथवा दुरध्वनीद्वारे संदेश देऊन कळविण्यात येईल.

(**टिप :-** वरीलप्रमाणे कंत्राटी पदे भरणेचे व त्यामध्ये ऐनवेळी बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकर्ता यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत.)

(वि.ह.माळी)
विभागीय वनअधिकारी (वन्यजीव),
कोल्हापूर

Scanned with CamScanner

**विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), कोल्हापूर यांचे कार्यालय**
सिमंतीनी अपार्टमेंट, सि.स.नं. १, ई वार्ड, रमणमळा, कोल्हापूर ४१६००३
**फोन क्र. ०२३१-२६६९७३० Email- dfowlkop@gmail.com**

दिनांक २६.०४.२०२१

## कंत्राटी तत्वावर पदे भरण्याकरीता जाहिरात

विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर यांचे अधिनस्त खालील पदे कंत्राटी पध्दतीने निवड करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | संख्या | कालावधी | मानधल (प्रति महा) अंदाजे |
|---|---|---|---|---|
| १ | निसर्ग तज्ञ | ०१ | ६ महिने | १५००० ते २०००० |
| २ | उपजिविका तज्ञ / सामाजिक तज्ञ | ०१ | ६ महिने | १५००० ते २०००० |
| ३ | कार्यालयीन व्यवस्थापक | ०१ | ११ महिने | १०००० |
| ४ | स्थापत्य अभियंता | ०१ | ११ महिने | १०००० ते १५००० |

**अर्ज सादर करणेचा कालावधी :-**

दिनांक २७ एप्रिल २०२१ ते ०३ मे २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) खालील पत्त्यावर लिखीत स्वरूपात अर्ज सादर करणेचे आहेत. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाबाबत योग्य त्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित सत्यप्रती जोडाव्यात. तसेच अर्जाची छाननी करून दिनांक ०५ मे २०२१ रोजी (शक्य झाल्यास) मुलाखतीस पात्र उमेदवारांच्या याद्या विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर या कार्यालयाच्या सुचना फलकावर लावणेत येतील व दिनांक ०५ मे २०२१ पासून (शक्य झाल्यास) मुलाखती प्रारंभ होतील. यादीत नमुद दिनांक व वेळेत मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेची जबाबदारी पात्र उमेदवाराची राहील. नमुद वेळेत व दिनांकास उपस्थित न राहणाऱ्या उमेदवाराचा विचार निवड प्रक्रियेत केला जाणार नाही. मुलाखतीस बोलावल्यास त्यावेळी मूळ कागदपत्रे दाखवावी लागतील.

**अर्ज सादर करणेचा पत्ता :-**

विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर, सिमंतीनी अपार्टमेंट, सि.स.नं. १, ई वार्ड, रमणमळा, कोल्हापूर ४१६००३
Email - dfowlkop@gmail.com
(**टिप :-** कोरोना प्रादुर्भावामुळे आपले अर्ज फक्त वरील ई-मेल आयडीवर सर्व कागदपत्रासहीत पाठवावेत.)

Scanned with CamScanner

**अटी व शर्ती :-**

१. वरील सर्व पदांसाठी संगणक ज्ञान आवश्यक. टंकलेखन - इंग्रजी ४० व मराठी ३० श.प्र.मी. असल्यास प्राधान्य देणेत येईल.

२. वरील सर्व पदांसाठी मराठी व इंग्रजीतून पत्रव्यवहार करता येणे आवश्यक आहे.

३. निम्नस्वाक्षरीकर्ता यांचे प्रशासकीय अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी सर्व नेमून दिलेली खास कामे व इतर नेहमीची कामे करणे तसेच वरील सर्व पदांवर निवड झालेल्या व्यक्तींना विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर यांचे कार्यकक्षेत काम करणे बंधनकारक राहील. जर कामामध्ये दिरंगाई / टाळाटाळ झाल्यास सदरची नियुक्ती रद्द करणेचे अधिकार निम्नस्वाक्षरीकर्ता यांना असतील.

४. कंत्राटी कर्मचारी यांना कंत्राटी तत्वावर महिना पूर्ण झालेवर अनुदान उपलब्धतेनुसार वेतन अदा करणेत येईल.

५. वरील सर्व पदे आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी राखून ठेवला आहे.

६. निवड करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यास / व्यक्तीस या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहीत नमुन्यात रू.१००/- चे स्टँम्प पेपर वर बंधपत्र सादर करावे लागेल.

७. कर्मचाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे शासनास आर्थिक नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई कर्मचाऱ्याकडून वसूल करून घेतली जाईल.

८. नियुक्तीची ११ / ६ महिन्यांची मुदत संपलेनंतर निम्नस्वाक्षरीकर्ता यांचे कामाबाबत समाधान झाले असल्यास व त्यांची शिफारस असल्यास फक्त ३ वेळेस नियुक्ती वाढवणेत येऊ शकते. (एकूण ४ terms)

९. कंत्राटी कर्मचारी हा शासनाच्या कायम सेवेत राहणेसाठी हक्काचा कोणताही दावा करू शकत नाही.

१०. निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना कालावधी पुर्ण होण्याच्या पुर्वी कारण न देता व कोणतीही पुर्व नोटीस न देता कामावरून काढून टाकणे व त्यांचे कंत्राट रद्द करणेचे अधिकार असतील.

११. कर्मचाऱ्याला ही एक महिना अगोदर लिखित नोटीस देऊन कंत्राट रद्द करण्याची मुभा आहे.

१२. कर्मचाऱ्याचे बंधपत्र रद्द करेपर्यंतच्या दिवसाचे वेतन देणे निम्नस्वाक्षरीकर्ता यांना बंधनकारक असेल.

१३. कर्मचाऱ्याच्या अखत्यारित असलेले शासकीय दस्ताऐवज, नस्ती, पत्रव्यवहार याची गोपनियता पाळणे बंधनकारक आहे. तसेच सदर शासकीय माहितीचा दुरूपयोग केल्यास त्यास कर्मचारी पूर्णपणे जबाबदार धरून प्रचलित नियत व कायद्यानुसार कारवाई केली जाईल.

१४. कामाचे तास हे कार्यालयीन कामाच्या गरजेनुसार वेळोवेळी निम्नस्वाक्षरीकर्ता यांना ठरवून दिल्याप्रमाणे राहतील.

१५. अर्जदार गुन्हेगारी प्रवृत्तीच्या किंवा पार्श्वभुमीचा नसावा. तसे आढळून आल्यास सदर अर्जदारास तात्काळ कमी करणेत येईल.

१६. बंधपत्र संपलेनंतर कर्मचाऱ्याच्या अखत्यारीत दिलेले शासकीय दस्तऐवज, कागदपत्रे, पुस्तके व इतर साहित्य कार्यालयात जमा करावे व दस्तऐवजाच्या कोणत्याही प्रती कोणत्याही प्रकारात सोबत नेऊ नये तसे आढळल्यास नियमाने होणाऱ्या कारवाईस पात्र राहाल.

१७. एखादया पदासाठी पात्र अर्जदारांची सर्व पात्रता समान आढळल्यास विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर यांचे पुनर्वसित व बफर झोनमधील अर्जदारास प्राधान्य देण्यात येईल.

Scanned with CamScanner

१८. सदरची पदे ही महाराष्ट्र शासनाची निर्मीत पदे नाहीत. सदर पदावर निवड केल्यास कोणताही अनुभवाचा दाखला, पदावर हक्क अथवा निर्माण होणाऱ्या शासकीय पदावर हक्क सांगता येणार नाही.

१९. प्राप्त अर्जाची छाननी करून मुलाखतीसाठी पात्र अर्जदारास अलाहिदा तारीख, वेळ व ठिकाण कळविणेत येईल.

पात्रता :-

**१. निसर्ग तज्ञ**

शास्त्र / भुगोल यामधील पदवी आणि रिमोट सेंन्सिग, जी.आय.एस. (Remote Sensing and G.I.S.) पदव्युत्तर पदवी तसेच वन्यजीव क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव व Erdass Imagine, Arc G.I.S., Q.G.I.S., Grass या सॉफटवेअर चे ज्ञान असणाऱ्यास प्राधान्य.

**२. उपजिविका तज्ञ / सामाजिक तज्ञ**

समाजशास्त्रातील पदव्युत्तर पदवी / समाजसेवा (Master of Social Work) (M.S.W.) किंवा कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि ग्रामीण भागात किंवा बफर क्षेत्रात उपजिविका निर्मितीचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

**३. कार्यालयीन व्यवस्थापक**

कोणत्याही शाखेचा पदवीधर, मराठी इंग्रजीतून पत्रव्यवहाराचे ज्ञान आवश्यक, टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मी., संगणक ज्ञान (M.S.C.I.T.) तसेच वनविभागात प्रशासकीय कामाचा विशेषकरून लेखाविषयक कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

**४. स्थापत्य अभियंता**

स्थापत्य शास्त्रातील (Civil Engineer) पदवी, संगणक ज्ञान, Auto Cad चे ज्ञान, शासकीय कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

(वि.ह.माळी)
विभागीय वनअधिकारी (वन्यजीव),
कोल्हापूर

Scanned with CamScanner

# अर्जाचा नमुना

Photo

प्रति,
सदस्य सचिव,
विभागीय वनअधिकारी (वन्यजीव),
कोल्हापूर

**विषय :-** .................................................................................. या पदासाठी अर्ज

**संदर्भ :-** ............................................... दिनांक ........................ मधील जाहिरात

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळातील तपशिलवार जाहिरात वाचली असून त्यातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव :-

२. जन्ततारीख अक्षरी व अंकी :-

३. संपूर्ण पत्ता व मोबाईल / संपर्क क्रमांक / ई-मेल आयडी :-

४. शैक्षणिक पात्रता :-

५. अनुभव :-

६. वेतनाची किमान अपेक्षा :-

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

ठिकाण :-

दिनांक :-

Scanned with CamScanner